# सहसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,

प्रादेशिक कार्यालय, शासकीय तंत्र निकेतन परीसर, सदर, नागपूर.

दुरध्वनी क्र. ०७१२–६४६५१४५/१४६ E-mail:ronagpur.dte@gmail.com फॅक्स क्र. ०७१२–२५६१६६३

Web Site : rdtenagpur.org.in


क्रमांक : तंशिस/प्राकाना/शैवि–३/रॅगिंग प्रतिबंध ॲक्ट/२०१३/3205

दि. 19 SEP 2013

प्रति,

संचालक/प्राचार्य
सर्व शासकीय, शासकीय अनुदानित, विद्यापीठ व्यवस्थापित,
विद्यापीठ विभाग तसेच विना अनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था
नागपूर विभाग, नागपूर

विषय :— रॅगिंग प्रतिबंध ॲक्टबाबत......
शैक्षणिक वर्ष २०१३–१४

संदर्भ :— मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/रॅगिंग/२०१३/११६६, दि. ११ सप्टेंबर २०१३.

उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, शासन पत्र क्रमांक संकीर्ण–(१०९८/११३/९८) विशि–३, दि. १५ मे १९९९ अन्वये रॅगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९, दि. ०१ जून १९९९ पासून अंमलात आलेला आहे. (सोबत प्रत जोडली आहे.)

सदर अधिनियमाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, आपले संस्थेतील पदवी/पदविका आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविणा–या संस्थेतील प्राचार्यांना रॅगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९ च्या ठळक प्रती आपले संस्थेच्या आवारात, क्लासमध्ये, कॅंटीन आणि वसतीगृह या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या निदर्शनास येईल अशा पध्दतीने प्रसिध्द करण्यांत याव्यात. तसेच प्रथम वर्ष विद्यार्थ्यांची व वरिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांच्या वेगवेगळया बैठका आयोजित करणे व त्यांना अधिनियमासंबंधी सुचना देण्यांत याव्यात. आणि रॅगिंग प्रकरण संस्थेत घडणार नाही याबाबत दक्षता घेण्यांत यावी. जर संस्थेत रॅगिंग प्रकरण घडल्यास संबंधित संस्थेच्या प्राचार्यांना जबाबदार धरण्यांत येईल.

रॅगिंग प्रकरण घडू नये म्हणून खालील सुचनांचे पालन करण्यांत यावे.

१. प्राचार्य, उपप्राचार्य, रेक्टर यांची निवासस्थाने कॉलेज व हॉस्टेल कॅम्पसमध्ये असावीत.
२. त्यांनी दररोज आकस्मिक भेटी, विशेषत: हॉस्टेलना रात्रीच्या वेळी भेटी देण्यांत याव्यात.
३. संस्थेच्या माहिती पुस्तिकेत याचे स्पष्टीकरण असावे व दरवर्षी प्रत्येक विद्यार्थी व पालकांकडून संबंधित विद्यार्थी रॅगिंगपासून दूर राहील असे प्रतिज्ञापत्र भरून घ्यावे.
४. वर्षातून एकदा, संस्थास्तरावर पालकांचे मेळावे वर्षभरात एक दोन वेळा आयोजित करावेत व संस्थेची शिस्त आणि विद्यार्थ्यांचे वर्तन या बाबींची त्यातून माहिती द्यावी.
५. विद्यार्थी परिषदांनी आपल्या कार्यक्रमातून रॅगिंग विरूध्द आवाज उठवावा.

सहपत्र : वरीलप्रमाणे.

(मुरलीधरराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर.

प्रत : मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई (का.क्र.२अ) यांना माहितीस सविनय सादर.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी – २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स – २२६९२१०२.

तार – EDUTECH E-mail : desk10@dte org.in Internet : www.dte.org.in


क्रमांक : १०/एनजीपी/रॅगिंग/२०१३/ 6049

दिनांक :

11 SEP 2013

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे.

**विषय : रॅगिंग प्रतिबंध ॲक्टबाबत...**

**शैक्षणिक वर्ष २०१३-१४**

शासन पत्र क्रमांक संकीर्ण-(१०९८/११३/९८) विशी-३, दि.२७ मे, १९९९ अन्वये रॅगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९ दि. ०१ जून, १९९९ पासून अंमलात आलेला आहे. (सोबत प्रत जोडली आहे.)

सदर अधिनियमाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आपल्या अखत्यारीतील पदविका अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम चालविणाऱ्या व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे अखत्यारील अल्पमुदतीचे अभ्यासक्रम चालविणाऱ्या सर्व शासकीय, शासकीय अनुदानित, विनाअनुदानित संस्थांच्या प्राचार्यांना रॅगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९ च्या ठळक प्रती संस्थेच्या आवारात, क्लासमध्ये, कॅंटीन आणि वसतीगृह या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या निदर्शनास येईल अशा पध्दतीने प्रसिध्द करण्याबाबत कळविण्यात यावे. तसेच प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांच्या व वरिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांच्या वेगवेगळया बैठका आयोजित करुन त्यांना सदर अधिनियमाबाबत सूचना देण्यात याव्यात. रॅगिंग प्रकरण घडणार नाही, याबाबत सर्व संस्थांच्या प्राचार्यांनी दक्षता घ्यावी अन्यथा रॅगिंग प्रकरण घडल्यास याबाबत संबंधित संस्थेच्या प्राचार्यांना जबाबदार धरण्यात येईल याची जाणीव सर्व संस्थांच्या प्राचार्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

रॅगिंग प्रकरण घडू नये म्हणून खालील सूचनांचे पालन करण्याबाबत संस्थाच्या प्राचार्यांना/ संचालकांना कळविण्यात यावे.

१. प्राचार्य, उपप्राचार्य, रेक्टर यांची निवासस्थाने कॉलेज व हॉस्टेल कॅम्पसमध्ये असावीत.
२. प्राचार्य, उपप्राचार्य, रेक्टर यांनी दररोज आकस्मिक भेटी, विशेषतः हॉस्टेलना रात्रीच्या वेळी भेटी देण्यात याव्यात.
३. संस्थेच्या माहिती पुस्तिकेत रॅगिंग प्रतिबंध ॲक्टबाबत स्पष्टीकरण असावे व दरवर्षी प्रत्येक विद्यार्थी व पालकांकडून संबंधित विद्यार्थी रॅगिंगपासून दुर राहिल असे प्रतिज्ञापत्र भरुन घेण्यात यावे..
४. संस्थास्तरावर पालकांचे मेळावे वर्षभरात एक दोन वेळा आयोजित करावेत व संस्थेची शिस्त आणि विद्यार्थ्यांचे वर्तन या बाबींची माहिती त्यातुन देण्यात यावी.
५. विद्यार्थी परिषदांनी त्यांच्या कार्यक्रमातून रॅगिंग विरुध्द आवाज उठवावा.

(डॉ. सुभाष महाजन)

प्र.संचालक,

तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी

**महत्वाचे**

**तातडीचे**

**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय, नागपूर**

**क्र.तंशिसं/प्राकाना/शैवि २/२०१३/ 3204**

**दिनांक:–** 19 SEP 2013

**प्रति,**

**नागपूर विभागातील सर्व संस्था.**

**सर्व संस्थेच्या प्राचार्य / संचालकांना कळविण्यांत येते की, उपरोक्त पत्रात नमूद केलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे.**

( गुलाबराव ठाकरे )

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,

नागपूर.

असा. क्र. ६८

रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साऊथ/२०/९९

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

### प्राधिकृत प्रकाशन

शनिवार, मे १५, १९९९/वैशाख २५, शके १९२१

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद)

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Prohibition of Ragging Act, 1999 (Mah. XXXIII of 1999), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRATIMA UMARJI,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

## MAHARASHTRA ACT No. XXXIII OF 1999.

*(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 15th May 1999.)*

*An Act to prohibit ragging in educational institutions in the State of Maharashtra.*

WHEREAS it is expedient to enact a special law to prohibit ragging in educational institutions in the State of Maharashtra; It is hereby enacted in the Fiftieth Year of the Republic of India as follows:—

1. (*1*) This Act may be called the Maharashtra Prohibition of Ragging Act, 1999. Short title and commencement.

(2) It shall come into force on such date as the State Government may, by notification in the *Official Gazette*, appoint.

Definitions. 2. In this Act, unless the context otherwise requires,—

(a) "educational institution" means and includes a college or other institution by whatever name called, carrying on the activity or imparting education therein (either exclusively or among other activities); and includes an orphanage or a boarding home or hostel or a tutorial institution or any other premises attached thereto;

(b) "head of the educational institution" means the Vice-Chancellor of the University, Dean of Medical Faculty, Director of the Institution or the Principal, Headmaster or the person responsible for the management of the educational institution;

(c) "ragging" means display of disorderly conduct, doing of any act which causes or is likely to cause physical or psychological harm or raise apprehension or fear or shame or embarrassment to a student in any educational institution and includes—

(i) teasing, abusing, threatening or playing practical jokes on, or causing hurt to, such student; or

(ii) asking a student to do any act or perform something which such student will not, in the ordinary course, willingly, do.

Prohibition of ragging. 3. Ragging within or outside of any educational institution is prohibited.

Penalty for ragging. 4. Whoever directly or indirectly commits, participates in, abets or propagates ragging within or outside any educational institution shall, on conviction, be punished with imprisonment for a term which may extend to two years and shall also be liable to a fine which may extend to ten thousand rupees.

Dismissal of student. 5. Any student convicted of an offence under section 4 shall be dismissed from the educational institution and such student shall not be admitted in any other educational institution for a period of five years from the date of order of such dismissal.

Suspension of student. 6. (1) Whenever any student or, as the case may be, the parent or guardian, or a teacher of an educational institution complaints, in writing, of ragging to the head of the educational institution, the head of that educational institution shall, without prejudice to the foregoing provisions, within seven days of the receipt of the complaint, enquire into the matter mentioned in the complaint and if, *prima facie*, it is found true, suspend the student who is accused of the offence, and shall, immediately forward the complaint to the police station having jurisdiction over the area in which the educational institution is situated, for further action.

(2) Where, on enquiry by the head of the educational institution, it is proved that there is no substance, *prima facie*, in the complaint received under sub-section (1), he shall intimate the fact, in writing, to the complainant.

(3) The decision of the head of the educational institution that the student has indulged in ragging under sub-section (1), shall be final.

Deemed abetment.

7. If the head of the educational institution fails or neglects to take action in the manner specified in section 6 when a complaint of ragging is made, such person shall be deemed to have abetted the offence of ragging and shall, on conviction, be punished as provided for in section 4.

Power to make rules.

8. (1) The State Government may, by notification in the *Official Gazette*, make rules for carrying out all or any of the purposes of this Act.

(2) Every rule made under this Act shall be laid, as soon as may be, after it is made, before each House of the State Legislature, while it is in session for a total period of thirty days, which may be comprised in one session or in two or more successive sessions, and if, before the expiry of the session in which it is so laid or the session immediately following, both Houses agree in making any modification in the rules or both Houses agree that the rule should not be made, and notify such decision in the *Official Gazette*, the rule shall, from the date of publication of such notification, have effect only in such modified form or be of no effect, as the case may be; so however, that any such modification or annulment shall be without prejudice to the validity of anything previously done or omitted to be done under that rule.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा क्र. ४२

रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साऊथ/२०/९९

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शनिवार, मे १५, १९९९/वैशाख २५, शके १९२१

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३.—महाराष्ट्र राज्यात शैक्षणिक संस्थांमध्ये रॅगिंग करण्यास मनाई करण्याकरिता अधिनियम .. | ४४९–४५१ |

दिनांक १३ मे १९९९ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

प्रतिमा उमरजी,
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

### सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३.

[राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक १५ मे १९९९ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.]

**महाराष्ट्र राज्यात शैक्षणिक संस्थांमध्ये रॅगिंग करण्यास मनाई करण्याकरिता अधिनियम.**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यात, शैक्षणिक संस्थांमध्ये रॅगिंग करण्यास मनाई करण्यासाठी एक विशेष कायदा अधिनियमित करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पन्नासाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र रॅगिंग करण्यास मनाई करणे अधिनियम, १९९९ असे म्हणावे. — संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या. २. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "शैक्षणिक संस्था" याचा अर्थ तीमध्ये शिक्षण देण्याचे (केवळ तेच किंवा इतर कार्याबरोबर) कार्य करणारे महाविद्यालय, किंवा कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारी अन्य संस्था असा आहे आणि त्यात त्यांचा समावेश होतो ; आणि तिच्याशी संलग्न असलेले अनाथालय, निवासगृह किंवा वसतिगृह किंवा पाठनिर्देश संस्था किंवा कोणतीही अन्य जागा यांचा त्यात समावेश होतो ;

(ख) "शैक्षणिक संस्थेचा प्रमुख" याचा अर्थ विद्यापीठाचा कुलगुरु, वैद्यक विद्याशाखेचा अधिष्ठाता, संस्थेचा संचालक किंवा प्राचार्य, मुख्याध्यापक किंवा शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनास जबाबदार असणारी व्यक्ती असा आहे ;

(ग) "रॅगिंग" या संज्ञेचा अर्थ, ज्यामुळे कोणत्याही शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थ्यास शारीरिक किंवा मानसिक हानी पोहोचत असेल किंवा पोहोचण्याची शक्यता असेल किंवा त्याच्यात धास्तीची किंवा भयाची अथवा लज्जेची किंवा अडचणीत आल्याची भावना निर्माण होत असेल असे गैरवर्तणुकीचे प्रदर्शन करणे किंवा असे कोणतेही कृत्य करणे असा आहे आणि त्यामध्ये, पुढील गोष्टींचा समावेश होतो :—

(एक) अशा विद्यार्थ्याला चिडवणे, शिवीगाळ करणे, धमकी देणे किंवा त्याच्या खोड्या काढणे, किंवा मनाला टोचेल असे बोलणे ; किंवा

(दोन) असा विद्यार्थी, सर्वसामान्यपणे जे कृत्य किंवा जी गोष्ट स्वेच्छेने करणार नाही असे कृत्य किंवा अशी गोष्ट त्यास करावयास सांगणे.

रॅगिंग करण्यास मनाई. ३. कोणत्याही शैक्षणिक संस्थेमध्ये किंवा तिच्या बाहेर रॅगिंग करण्यास मनाई आहे.

रॅगिंग करण्याबद्दल शास्ती. ४. जो कोणी, कोणत्याही शैक्षणिक संस्थेमध्ये किंवा तिच्याबाहेर प्रत्यक्ष रीत्या किंवा अप्रत्यक्ष रीत्या रॅगिंग करत असेल, त्यात भाग घेत असेल, त्यास अपप्रेरणा देत असेल, किंवा त्याचा प्रचार करत असेल तर, त्यास अपराधसिद्धीनंतर, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची ~~शिक्षा होईल~~ आणि दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची देखील शिक्षा होण्यास तो पात्र असेल.

विद्यार्थ्याला काढून टाकणे. ५. कलम ४ खालील अपराधाबद्दल सिद्धापराधी ठरलेल्या कोणत्याही विद्यार्थ्यास शैक्षणिक संस्थेतून काढून टाकण्यात येईल आणि अशाप्रकारे काढून टाकण्यात आल्याच्या आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीकरिता कोणत्याही इतर शैक्षणिक संस्थेमध्ये अशा विद्यार्थ्यास प्रवेश देण्यात येणार नाही.

विद्यार्थ्याला निलंबित करणे. ६. (१) जेव्हा कोणताही विद्यार्थी किंवा यथास्थिति, आई-वडिल किंवा पालक, किंवा शैक्षणिक संस्थेचा शिक्षक, शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाकडे रॅगिंगची लेखी तक्रार करील तर, त्या शैक्षणिक संस्थेचा प्रमुख, पूर्वगामी तरतुदींना बाध न आणता, तक्रार मिळाल्यापासून सात दिवसांच्या आत तक्रारीमध्ये नमूद केलेल्या प्रकरणाची चौकशी करील आणि जर, प्रथमदर्शनी, ती खरी असल्याचे आढळून आल्यास, अपराधाचा आरोप असलेल्या विद्यार्थ्याला निलंबित करील आणि ती शैक्षणिक संस्था ज्या क्षेत्रामध्ये असेल त्या क्षेत्रावर अधिकारिता असलेल्या पोलीस ठाण्याकडे तक्रार पुढील कार्यवाहीसाठी त्वरित पाठवील.

(२) ज्या बाबतीत पोट-कलम (१) अन्वये मिळालेल्या तक्रारीमध्ये, प्रथमदर्शनी काही तथ्य नसल्याचे, शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाने केलेल्या चौकशीनंतर सिद्ध झाल्यास, तो, तक्रारदाराला वस्तुस्थितीबाबत लेखी कळवील.

(३) पोट-कलम (१) अन्वये शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाने, विद्यार्थ्यांचा रॅगिंगमध्ये सहभाग आहे असा दिलेला निर्णय अंतिम असेल.

७. रॅगिंगची तक्रार केली असताना, शैक्षणिक संस्थेचा प्रमुख कलम ६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने कारवाई करण्यात कसूर किंवा हयगय करील तर, रॅगिंग सारख्या अपराधाला अशा व्यक्तीने अपप्रेरणा दिल्याचे मानले जाईल आणि अपराधसिद्धिनंतर कलम ४ मध्ये तरतूद केल्या-प्रमाण तिला शिक्षा करण्यात येईल. अपप्रेरणा दिल्याचे मानणे.

८. (१) राज्य शासनास या अधिनियमाची सर्व किंवा कोणतीही प्रयोजने पार पाडण्यासाठी राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो तयार करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्यांच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्या-पूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे निर्णय घेतील तर, असा निर्णय राजपत्रात अशा निर्णयाबद्दलची अधि-सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून अशा फेरबदल केलेल्या स्वरूपात अंमलात येईल किंवा यथास्थिति मुळीच अंमलात येणार नाही तथापि, असा फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करावयाचे राहिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेस बाध येणार नाही.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.

# NOTIFICATION

Higher & Technical Education Department,
Mantralaya Annexe, Mumbai-400 032,
Dated the 19th May, 1999.

Maharashtra, Prohibition of Ragging Act, 1999.

No. Sankirna/1098/(133/98)/UNI.3.- In exercise of the powers conferred by sub-section (2) of Section 1 of the Maharashtra Prohibition of Ragging Act, 1999 (Mah.XXXIII of 1999), the Goverment of Maharashtra hereby appoints the 1st day of June, 1999 to be the date on which the said Act shall come into force.

By Order and in the name of the Governor of Maharashtra;

VPRaja
19/5/99

( V.P. Raja )
Secretary to the Government.

Publication of the
In the Maharashtra Government
Gazette Extraordinary part IV-B

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Higher & Technical Education Department
Resolution No. Sankirna / 1098 / [ 133/98] / Uni-3.
Mantralaya Annexe, Mumbai-400032.
Dated the 19 th May, 1999.

RESOLUTION:- The appended Notification should be published in Maharasht Government Gazettee Extraordinary part IV-B, dated the 19th May, 1999.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S.S. Kharat

( S.S. Kharat)
Section Officer to Government.

**To,**
The Manager, Government Central Press, Charni Road, Mumbai- with a copy of the Notification (English & Marathi ) with a request to forward 1 gazette copies of the Notification to the Law & Judiciary Department and 20 copies to the Higher & Technical Education Department, Mantralaya, Mumbai.

**Copy to**, (English & Marathi copies of the same Notification are enclosed herwith)
The Principal Secretary, Prime Minister's Secretariat , New Delhi. (10 copies of Notification forwarded with compliments.)
The Secretary to the Chancellor, Raj Bhavan, Mumbai.
The Secretary, Parliamentary Affairs Department, New Delhi.
The Secretary , Maharashtra Legislative Secretariat, Vidhan Bhavan, Mumbai,
The Directorate of Languages, Near Staff College, Opp. C.S.T. Station, Mumbai for information.
The Departmental Liasion Officer for Directorate of Publicity, Mantralaya, Mumbai.
The Library, Law & Judiciary Department (5 copies).
All the Vice -Chancellors of the Universities in the State.
Secretary , Higher & Technical Education Department, Mantralaya, Mumbai.
Secretary, Medical Education Department,
Secretary, Planning Department,
Secretary, Finance Department,
Secretary, Sports Department,
Director (Higher Education), Maharashtra State, Pune.
Director , Technical Education, Maharashtra State,
Director, Medical Education, Maharashtra State,
Director, Vocational Education, Maharashtra State, All Regional Joint Directors. (Higher Education),
Private Secretary to the Chief Minister, Maharashtra State,
Private Secretary to the Minister , Higher & Technical Education Department,
Private Secretary to the State Minister , Higher & Technical Education Department
Private Secretary to the Minister, Medical Education Department
Private Secretary to the State Minister, Medical Education Department
Private Secretary to the Minister, Sports Department
All Registrars of the Universities in the State,
Joint Secretary / All Deputy Secretaries, Higher & Technical Education Dept.
All Under Secretaries, Section Officers of Higher & Technical Education Dept.
Select file Uni-3

असा. क्र. ३०१ रजिस्टर्ड नं. एमएच/एसबीआय-साऊथ/२०/९९

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, ऑक्टोबर ४, १९९९/आश्विन १२, शके १९२१

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

## भाग चार-ब

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यामध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश याव्यतिरिक्त) नियम व आदेश

### उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ मे १९९९

### अधिसूचना

**महाराष्ट्र रॅगिंग करण्यास मनाई करणे अधिनियम, १९९९**

क्रमांक संकीर्ण-१०९८/(१३३/९८)/विशि-३.— महाराष्ट्र रॅगिंग करण्यास मनाई करणे अधिनियम, १९९९ (१९९९ चा महा. ३३) मधील कलम १ च्या पोट-कलम (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, ज्या तारखेपासून उक्त अधिनियम अमलात येईल ती तारीख म्हणून दिनांक १ जून १९९९ ही तारीख नेमून देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

व्ही. पी. राजा,
शासनाचे सचिव.

## HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Mantralaya Annex, Mumbai 400 032, dated the 19th May 1999

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION OF RAGGING ACT, 1999.

No. Sankirna. 1098/(133/98)/UNI-3.—In exercise of the powers conferred by sub-section (2) of section 1 of the Maharashtra Prohibition of Ragging Act, 1999 (Mah. XXXIII of 1999), the Government of Maharashtra hereby appoints the 1st day of June 1999 to be the date on which the said Act shall come into force.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V. P. RAJA,
Secretary to Government.



शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई